**सं. फौ. ख. क्र. ३/२०२५**
**निशाणी क्र.२०**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १:**

कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव :– श्री. बाळासाहेब खुशाबा डोळस
वय :– ५९ वर्षे,
धंदा :– सेवानिवृत्त.
राहणार :– धनकवडी, पुणे.

**फिर्यादीतर्फे वकील श्रीमती अनुराधा पडवळ यांच्यामार्फत सुरु :–**

०१. दिनांक ०५.११.२०२४ रोजी मी वारजे क्षेत्रीय कार्यालय येथे हॉर्ट्रीकल्चर मिस्त्री म्हणुन कार्यरत होतो. सुनिल मारुती परब यांनी माहिती अधिकार खाली अर्ज केलेले होते तसेच त्यांनी कार्यालयास लेखी तक्रार दाखल केली होती की, अक्षय सहनिवास, शाहु कॉलनी, लेन क्र.११, कर्वेनगर या सोसायटीमधील झाडांची परवानगी पेक्षा जास्त प्रमाणात छाटणी करण्यात आलेली आहे. आरोपी सोसायटी यांनी दिनांक ०६.०५.२०२४ रोजी सोसायटीमधील बदाम व अशोक या झाडांची छाटणी साठी परवानगी करीता अर्ज सादर केलेला होता. त्याप्रमाणे दिनांक २२.०५.२०२४ रोजी आरोपी यांना वृक्षांची छाटणी करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. सदरची परवानगी दिल्यानंतर ३ महिन्यांच्या आत छाटणी करणे आवश्यक होते परंतु सोसायटीने ३ महिन्यांच्या आत झाडांची छाटनी केली नाही. त्यानंतर मी दिनांक ०५.११.२०२४ रोजी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, सदर सोसायटीने पुर्वीच्या परवानगी नुसार झाडांची छाटनी प्रमाणापेक्षा जास्त केलेली होती असे निदर्शनास आले. त्यामुळे मी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. सदर पंचनाम्यास **निशाणी २१** देण्यात आली. त्यानुसार मी कार्यालयाकडे सविस्तर अहवाल सादर केला. आता मला तो अहवाल दाखवण्यात आला त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर अहवालास **निशाणी २२** देण्यात आली. त्यानंतर आरोपी सोसायटीस दिनांक ०६.११.२०२४ व २५.११.२०२४ रोजी दोन नोटीस पाठविण्यात आल्या. सदर नोटीसच्या स्थळप्रतींना **निशाणी २३ व २४** देण्यात आली. सदर नोटीसला सोसायटीतर्फे दिनांक १२.११.२०२४ व ०४.१२.२०२४ रोजी खुलासा सादर करण्यात आला. सदरचे खुलाशे समाधानकारक नसल्याने आरोपी यांच्याविरूद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यात आली. मी फिर्याद सोबत घटना ठिकाणावरील झाडांचे फोटो सादर केलेले आहे. सदर फोटोस **अर्टिकल**

**अ** देण्यात आले. प्रस्तुत फिर्याद दाखल करण्याकरीता मला अधिकार देण्यात आलेले आहेत.
**सरतपास पुर्ण...**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. आर. मराठे यांच्यामार्फत सुरु :-**

०२. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्याचे कोणतेही अधिकार पत्र देण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मा. आयुक्त पुणे महानगरपालिका यांनी माझ्या वैयक्तीक नावाने अधिकार पत्र दिलेले नाही. आरोपी सोसायटीस पाहणी केल्यानंतरच झाडांची छाटणी करण्याकरीता परवानगी देण्यात आलेली होती. मुळ तक्रारदार सुनिल परब यांनी पुणे महानगरपालिका कडे वृक्ष छाटणी बाबत कारवाई करत नाही म्हणुन माझ्या विरूद्ध तक्रार देखील केलेली होती. पंचनामा करण्याकरीता सोसायटीचे चेअरमन व सेक्रेटरी म्हणजेच आरोपी यांना पंचनामा करण्यापुर्वी मी कोणतेही लेखी पत्र अगर नोटीस दिले नव्हते. पंचनामा करतेवेळी तक्रारदार सुनिल परब हे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, मुळ तक्रारदार व पंच क्र.१ ही एकच व्यक्ती आहे. तसेच पंच क्र.२ ह्या सुनिल परब यांच्या पत्नी आहेत. पंचनामा करतेवेळी दोन पंचांव्यतीरीक्त सोसायटीचे इतर कोणतेही सभासद त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची वृक्ष छाटणी आरोपी करत असलेबाबत कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार माझ्याकडे उपलब्ध नाही. आजरोजी फिर्यादमध्ये नमूद केलेली झाडे सुस्थीतीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मुळ तक्रारदार सुनिल परब यांच्या दबावामुळे मी आरोपींविरद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | समक्ष, | श्रवणोत्तर स्वीकृत, |
|---|---|---|
| | **सही/-** | **सही/-** |
| ठिकाणः पुणे | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** |
| दिनांकः ०३/०८/२०२६. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| | (मनपा न्यायालय), जि. पुणे. | (मनपा न्यायालय), जि. पुणे. |